Vol 3 Issue 9 March 2014 ISSN No :2231-5063

International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest,Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.net**

Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 2.2052(UIF)
Volume-3 | Issue-9 | March-2014
Available online at www.aygrt.isrj.net

GRT

# कथा वाङ्‌मय : स्वरूप आणि वाटचाल

माधव बसवंते

*सांराशः*

सामान्यतः कथा हा कथात्मक साहित्याच्या प्रदीर्घ परंपरेशी अतूट जोडला गेलेला हा एक वाङ्‌मय प्रकार आहे. हरिभाऊ आपटे यांनी इ.स. 1880 रोजी करमणूक पत्र सुरू केले. त्या वर्षापासूनच कथा वाङ्‌मय प्रकाराचा आरंभ झाला असे मानले जाते. प्राचीन काळी आख्यानक कविता, कथागीत, पोवाडा, लावणी यासारख्या माध्यमांतून कथा प्रगट होत होती. मराठी मौखिक परंपरेत लोककथा, नीतिकथा, कहाणी, दैवतकथा, नक्षत्रकथा, व्रतकथा, आख्यायिक यासारखे कथाप्रकार दिसून येतात. म्हणून कथेचा जन्म हा भाषेच्या जन्मइतकाच प्राचीन असल्याचे दिसून येते. मराठी कथा ही प्रामख्याने स्फूट गोष्ट, संपूर्ण गोष्ट, लघुकथा आणि नवकथा अशा विकासाच्या चार टप्प्यातून प्रवास करताना आपणास दिसून येते. या कथा वाङ्‌मयांचा प्रवाह प्रामुख्याने स्थूलाकडून सूक्ष्माकडे जात असताना दिसून येत असला तरी लोकांचे मनोरंजन करून त्यांना अध्यात्माचे व भक्तिमार्गाचे धडे देणे हे कथा वाङ्‌मयाचे प्रयोजन होते. मराठी लोकसाहित्याला कथा वाङ्‌मयाचा मोठा वारसा लाभलेला आहे. मुद्रणपूर्वकाळात कथा वाङ्‌मय हे लिखित स्वरूपात अस्तित्वात नव्हते तर ते मौखिक परंपरेने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरीत होत होते.

## प्रस्तावनाः

मराठी कथा वाङ्‌मयाचे आद्यप्रवर्तक म्हणून हरिभाऊ आपटेंचा उल्लेख करावा लागतो. भारतीय साहित्यांत कथा ही प्रामख्याने विकासाच्या तीन अवस्थांतून प्रवास केल्याचे दिसते. त्यातील पहिल्या अवस्थेत कथा ही वैदिक वाङ्‌मय, रामायण–महाभारत आणि पुराणात बोधरूपाने दैवताप्रमाणे दैवतकथा होती. दुसऱ्या अवस्थेत ती स्वतंत्रपणे लिहिल्या गेली, ज्यात बौद्ध जातके, पंचतंत्र, हितोपदेश, जैनचुर्णी, कथासरित सागर, वेताळपंचविशी इत्यादींचा समावेश करता येईल, तर तिसऱ्या अवस्थेत मूळ पारंपारिक अद्भूत कथेला ललित वाङ्‌मयाचे वैभव प्राप्त झाले. मराठी भाषेच्या लिखित वाङ्‌मयाचा पहिला मान हा प्रामुख्याने महानुभव साहित्यास द्यावा लागतो. लीळाचरित्रातील अनेक कथांतून श्रीचक्रधरांच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वाची जाणीव होते. या लीळेत श्रीचक्रधरांच्या जीवनातील अनेक प्रसंग कथारूपांनी रेखाटले आहेत. संत साहित्यामध्येही ईश्वरभक्तीच्या कथा दिसून येतात. त्याचबरोबर संत नामदेवाच्या चरित्रातही अनेक कथा साकारल्या आहेत. इ.स. 1806 मध्ये अर्वाचीन मराठी कथा वाङ्‌मयाला प्रारंभ झाल्याचे दिसून येते. या कालखंडामध्ये तामीळनाडूतील तंजावर येथील शिवाजी राजांचे वंशज सरफोजी राजे भोसले यांनी त्यांच्या दरबारातील सख्खन पंडित यांच्या साह्याने इसापनीतीचे भाषांतर करून ते 'बालबोधमुक्तावली' या शीर्षकाखाली मुद्रित केले. त्यानंतर विल्यम केरी यांनी मोडी लिपीत गोष्टींची पुस्तके मुद्रित केली. त्यापुढे अनेक लेखकांनी मराठी कथा वाङ्‌मयाचा प्रवाह अधिक गतिमान केला आणि अनेक नियतकालिकांच्या मजकूर गरजांतून कथा वाङ्‌मयाचे लेखन करण्यात आले.

## कथा वाङ्‌मयाची वाटचाल

हरिभाऊंच्या 'स्फुटगोष्टी' पासून आधुनिक मराठी कथा वाङ्‌मयाचा प्रवाह सुरु झाला. हरिभाऊंनी कथेला स्वतंत्र आकार दिला. त्यांची गोष्ट वा कथा ही प्रामख्याने कौटुंबिक स्वरूपाची असून ती मध्यमवर्गीय व पांढरपेशा कुटुंबियांच्या जीवनातच अधिक रमते. म्हणूनच हरिभाऊंच्या स्फूटगोष्टी या प्रामख्याने घटनाप्रधान, पाल्हाळीक, चर्चाप्रधान व अतिरंजित झाल्या आहेत. याच काळात अनुवादित कथांचा पूर आला होता. एकंदरीत हरिभाऊंच्या कालखंडात कथा वाङ्‌मयांची उपेक्षाच झाल्याचे दिसून येते. त्यानंतर गुर्जरांनी मराठी कथेची दृष्टी बदलून कथेत रंजकता आणली. निवेदनशैली आणि रचनांच्या विविध प्रयोगापुढे गुर्जरांचा कालखंड 'सपूर्ण गोष्टी'चा कालखंड म्हणून ओळखला जातो.

इ.स. 1926 नंतरचा कालखंड हा यशवंत–रत्नाकर कालखंड म्हणून ओळखला जातो. इ.स. 1926 मध्ये रत्नाकर व इ.स. 1928 मध्ये यशवंत मासिकाचा प्रारंभ झाला. इ.स. 1926 ते 1940 च्या कालखंडातील रत्नाकर, यशवंत, किर्लोस्कर, ज्योत्स्ना, प्रतिमा यासारख्या अनेक मासिकांनी मराठी लघुकथेचे दालन समृद्ध केले. याच काळात लघुकथा हे नाव रूढ झाले. ना.सी. फडके व वि.स. खांडेकर या प्रमुख कथाकारांनी मराठी लघुकथेत मोठी भर घातली, म्हणूनच या कालखंला 'फडके–खांडेकर युग' किंवा लघुकथायुग असेही म्हटले जाते. ना.सी. फडके यांनी मराठी कथेला सौंदर्यदृष्टी दिली, तर वि.स. खांडेकरांनी त्यात सामाजिक आशय भरून तिला जीवनाभिमुख बनविले. प्रादेशिक

ग्रामीण, दलित आणि उपेक्षितांचे चित्र याच काळात कथांमध्ये चित्रित झाले. चिं.वि. जोशी व प्र.के. अत्रे यांनी उपहास, उपरोध व विसंगतीवर आधारीत विनोदी कथांचे दालन सजविले. रुपककथा व लघुत्तम कथा हे कथाप्रकार पुढे येऊन कथेच्या तंत्रदृष्ट्या व विषयदृष्ट्यात विविधता आली. स्त्री, महिला, गृहलक्ष्मी, मनोरमा, सरस्वती, संजीवनी या नियतकालिकांतून स्त्रियांनी कथालेखन सुरु केले. इ.स. 1940 मध्ये कथेत कृत्रिमता व सांकेतिकता निर्माण झाल्यामुळे कथाक्षेत्रात एक प्रकारची पोकळी निर्माण झाली.

इ.स. 1943–44 नंतर मराठी कथा नवे स्वरूप धारण केली. रा.भि. जोशी, प्रभाकर पाध्ये, वामन चोरघडे, कुसुमावती देशपांडे यांच्या कथांतून मांगल्य, संस्कार व चिरंतर जीवनमूल्य साकारले आहे. म्हणूनच या काळात नवकथेची चाहूल निर्माण झाली. इ.स. 1945 च्या सुमारास सत्यकथा या नियतकालिकाचा प्रारंभ झाला. दुसऱ्या महायुद्धाचे झालेले परिणाम आणि माणूस यंत्राचा झालेला गुलाम हे विषय या काळातील कथांमध्ये प्रामुख्याने दिसून येतात. अरविंद गोखले, गंगाधर गाडगीळ, पु.भा. भावे आणि व्यंकटेश माडगूळकर या कथाकारांनी मराठी कथांचे बाह्य स्वरूप व आकारही बदलून टाकले. त्यांच्या कथांची निवेदनशैली आकर्षक आणि प्रभावी आहे. गंगाधर गाडगीळांनी मराठी कथेत नव–नवे प्रयोग केले असून त्यांनी आपल्या निवेदनशैलीत अनेक अर्थांची वलये निर्माण केली आहेत. तसेच त्यांनी आपल्या कथांमध्ये उपमा, उत्प्रेक्षा व प्रतिमांचा कल्पकतापूर्वक वापर केला आहे. म्हणूनच त्यांची कथा ही आशयाशी एकरूप आणि प्रयोगशील झाली आहे. व्यंकटेश माडगूळकरांची कथा मातीतून निर्माण झाली असून तिच्यात जिवंतपणा जाणवतो. मराठी ग्रामीण कथेला अद्भूत आणि कल्पनारम्यतेच्या कोंडीतून सोडवून माडगूळकरांनी वास्तव ग्रामीण कथेचा आदर्श निर्माण केला. त्यानंतर शांताराम, दि.बा. मोकाशी, सदानंद रेगे, श्री ज. जोशी, पु.शि. रेगे, अच्युत बर्वे, शं.ना. नवरे, स.आ. जोगळेकर यासारख्या अनेक कथाकारांनी मराठी कथाविश्व फुलविले. श्री.म. माटे, म.भा. भोसले, शंकर पाटील, उद्धव शेळके, द.मा. मिरासदार, आण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, गो.नी. दांडेकर, मधु मंगेश कर्णिक, रा.रं. बोराडे या कथाकारांनी साक्षेपाने कथालेखन केले. त्याचबरोबर कमला फडके, शांता शेळके, योगिनी जोगळेकर, वसुंधरा पटवर्धन, स्नेहलता दसनूरकर यासारख्या कथालेखिकांनी आपल्या कथांतून स्त्रियांच्या जीवनातील भीषण व करुणालय नाट्य उत्कटपणे व्यक्त केले आहे.

इ.स. 1960 मध्ये नव्या जाणिवा घेऊन नवकथेने जुन्या कथेची चौकट मोडली. जी.ए. कुलकर्णी, चि.त्र्यं. खानोलकर, विद्याधर पुंडलिक, दिलीप चित्रे, कमल देसाई, विजया राजाध्यक्ष, यासारख्या कथाकारांनी आपल्या कथांतून माणसांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. जी. ए. कुलकर्णी यांच्या कथेत लोकसाहित्याच्या चित्रणाबरोबरच वैश्विक सत्याचा शोध घेण्याचा तत्त्वचिंतक ध्यास आहे. इ.स. 1960 नंतर आशय आणि अभिव्यक्तीच्या दृष्टीने स्त्रियांचे कथालेखन प्रभावशाली राहिले आहे. कमल देसाई, विजया राजाध्यक्ष, सरिता पत्की, वसुधा पाटील, ज्योत्स्ना देवधर, शकुंतला गोगटे, शैलजा राजे, गौरी देशपांडे, उर्मिला शिरूर, राणी उपाध्ये, सानिया यांनी जीवनातील दुःख, ताण–तणाव, प्रंसग आपल्या कथांतून व्यक्त केले आहेत. तसेच अनेक दलित कथाकारांनी आपल्या जीवनातील व्यथा अधिक तीव्रतेने चित्रित केल्या आहेत.

### *कथा वाङ्मय : विशेष*

कथा वाङ्मयाची शब्दमर्यादा मर्यादित स्वरूपाची असते. कथेत रचनेचे आणि अनुभवाचे एककेंद्रित्व असते. भावकाव्याशी नाते सांगणाऱ्या शैलीत लघुकथा लिहिता येते. मात्र गद्य प्रकृतीच्या शैलीत कथ लिहिता येत नाही. कथांची शैली ही गद्यस्वरूपाची असली तरी तिच्याच एक प्रकारचा हलकेपणा असतो. कथा आणि कादंबरी यांची बलस्थाने भिन्न भिन्न आहेत. मराठी कथेचे लघुरूप तिच्या संस्काराची एकता, अनुभवाची एकात्मता, एकजिनशीपणा व एकविधता यावरून मराठी कथावाङ्मयाचे काही स्वरूपविशेष स्पष्ट करता येतात.

1.कथा वाङ्मयांच्या एककेंद्रीपणामुळे तिच्या संस्कारात एकता ही येतच असते.
2.कथेच्या मर्यादामुळे तिच्यातील आशयातील व्याप्तीला व परिणामाला मर्यादा येतात.
3.कथा वाङ्मयाचे स्वरूप, विषय व तिच्या विशिष्ट लांबीला मर्यादा नसली तरी तिच्या आकारामुळे तिच्यावर मर्यादा येते.
4.कथारचनेच्या संघटनेत एककेंद्रित्व, मितव्यय, संक्षेप व नेमकेपणा येतो.
5.कथेच्या लांबीची मर्यादा असल्यामुळे त्यातून प्रामख्याने एकच एक संस्कार उमटवित असतो.
6.कथावाङ्मयाची बलस्थाने सर्वस्वी लेखकावरच अवलंबून असतात.

### *कथांचे उपप्रकार*

अगदी प्राचीन काळापासून मौखिक परंपरेत लोककथा, नीतिकथा, कहाणी, दैवतकथा, नक्षत्रकथा, व्रतकथा, आख्यायिका यासारखे अनेक कथाप्रकार प्रामुख्याने दिसून येतात. कथावाङ्मयाच्या रचनेच्या दृष्टीने खालील कथेचे उपप्रकार दिसून येतात.

कथेचा पहिला उपप्रकार म्हणून 'दीर्घकथेचा' उल्लेख करावा लागतो. या दीर्घकथेत विस्तार अधिक असतो. त्यामुळे तिची व्याप्ती अधिक असते. दीर्घकथेत जीवनदर्शनाची सखोलता अधिक असल्यामुळे तिच्या परिणामाची शक्यताही अधिकच असते. दीर्घकथेत अनुभव घटक व त्यांच्यातील परस्परसंबंध अनेकविध असतात.

कथेचा दुसरा उपप्रकार म्हणून लघुकथेचा उल्लेख करावा लागतो. बारीक बारीक आशयसूत्र कमीत कमी शब्दांच्या माध्यमातून लघुकथेत मांडले जातात. कोणत्याही कथात्मक लेखनाला लघुकथा म्हणण्याची प्रथा आहे. त्यामुळे बाळबोध दिसले तरी ती लघुकथा असावी असे विधान करता येणे शक्य आहे. रूपककथा किंवा दृष्टांतकथांचा निर्देश लघुकथा म्हणून करता येईल. लोकपरंपरेत अशा लघुकथांची अनेक उदाहरणे दिसून येतात.

कथेचा उपप्रकार म्हणून कथामालिकेचा निर्देश करावा लागतो. यात एकाहून अधिक कथा मिळून कथामालिका आकारली जाते. या कथामालिकेतील प्रत्येक कथेला स्वतंत्र अस्तित्व असते. म्हणून कथा मालिकेतील प्रत्येक कथेचा स्वतंत्रपणे आस्वाद घेता येतो.

त्यानंतर कथेचे उपप्रकार म्हणून साखळी कथांचाही उल्लेख करावा लागतो. या साखळी कथांचे तंत्र प्राचीन गद्यामध्ये दिसून येते. याचबरोबर अनुभवांच्या अंगाने विचार करताना आपणास पौराणिक, ऐतिहासिक, सामाजिक, ग्रामीण, प्रादेशिक, दलित, गूढ ,रहस्य, विज्ञान

यासारखे अनेक प्रकार कथेच्या वर्गीकरणाच्या सोयीसाठी स्पष्ट करता येतात.

### *कथेचे घटक (समष्टी)*

एक स्वतंत्र वाङ्मयप्रकार म्हणून कथेचे अस्तित्व अबाधित आहे. लेखकाची जीवनदृष्टी आणि अनुभव यातून कथानक आकार घेत असते. अशा या कथात्मक साहित्याची संहिता निवेदनाच्या माध्यमातून घडत असते. या कथात्मक साहित्याची निर्मिती अनुभवार्थ, कथानक, व्यक्तिचित्रण, वातावरण, निवेदन आणि भाषा या घटकांच्या माध्यमातून पूर्ण होत असते.

### *अनुभवार्थ*

मराठी वाङ्मयाच्या इतर साहित्यप्रकारातील अनुभवार्थप्रमाणेच कथेतीलही अनुभवार्थ हा मानवी जीवनासंबंधी असतो. लेखक हे आपल्या कल्पित अथवा वास्तव जीवनविश्वातून कथाविश्व निर्माण करीत असतो. हा त्यांचा अनुभव अनेकविध प्रकृतीचा असू शकतो. तसेच हा अनुभव अंतर्मुख प्रकृती, बर्हिमुख प्रकृती व वस्तुनिष्ठही असू शकतो. अनुभवरूपांतील या विविधेतूनच कथेला रूपबंधाची विविधता लाभते.

### *कथानक*

कथानक, पात्र, वातावरण, निवेदनपद्धती व भाषा हे कथेचे मूलघटक आहेत. या सर्व घटकाच्या सहाय्याने कथाकार कथेची निर्मिती करीत असतो. लेखक निवेदनाच्या माध्यमातून विशिष्ट जीवनविश्वातील अनुभव कथन करीत असतो. लेखकाचे हे निवेदन घटना, प्रसंग अथवा वातावरण निर्मितीसाठी केलेले असते. याच निवेदनाच्या कथानकातून अनुभवार्थ साकारला जातो. घटना व पात्रे ही कथानकाची उभारणी करीत असतात. कथानक हे कथेतील गतिशील घटक असते. एकंदरीत कार्यकारणभाव व कालानुक्रम या तत्वांच्या आधारे केलेली घटनांची गुंफण म्हणजेच कथानक होय. विशिष्ट भावाशय निर्माण करून तो कथांकित करणे हेच या कथानकाचे उपयोजन असते.

### *व्यक्तिचित्रण*

व्यक्तिचित्रण हा कथेचा एक महत्त्वपूर्ण मूलघटक आहे. कथेत व्यक्तिच्या ज्या शब्दरूप प्रतिमा रेखाटल्या जातात त्या प्रतिमेला पात्र म्हणतात. या पात्रांना स्वविशिष्ट भावविश्व लाभलेले असते. पात्राचे प्रमुख कथात्मकार्यही कथार्थाची निर्मिती असते. कथाकार हे एखाद्या व्यक्तिची वृत्ती, कृती, उक्ती, भावना, कल्पना, संवेदना, विचार, जीवनपद्धती व जीवनदृष्टी इत्यादीच्या या चित्रणातून त्या व्यक्तिची शब्दरूप प्रतिमा कथेत निर्माण करीत असतात. अशा स्वरूपाची पात्रे निर्माण करीत असताना कथाकाराला काही नैसर्गिक मर्यादाही येत असतात. कथेतील ही पात्रे शब्दरूपात असली तरी त्यांना वास्तवातील माणसांप्रमाणेच शारीरिक, मानसिक व सामाजिक अंगे लाभलेली असतात.

### *वातावरण*

वातावरण हा कथेचा एक महत्त्वपूर्ण मूलघटक आहे. वातावरण हा कथाकर्थाच्या निर्मितीतील एक क्रियांशील घटक असतो. प्रभावी कथेसाठी कल्पित परिसर निर्माण करणे हे वातावरणाचे प्रयोजन असते. कथेतील पात्र, घटना, प्रसंग, नाट्य, संघर्ष इत्यादीविषयी वातावरण हा घटक आपली महत्त्वपूर्ण जबाबदारी पार पाडीत असतो. कथेतील सामाजिक, सांस्कृतिक, भौगोलिक यासारख्या भावना वातावरणाच्या माध्यमातून अधिक स्पष्ट केल्या जातात. म्हणून लेखकाला वातावरणाच्या निर्मितीची कलादृष्टी असणे महत्वाचे असते.

### *निवेदन*

कथाकार हा कथा सांगण्यासाठी निवेदक नावाच्या पात्राची निर्मिती करीत असतो. कथेतील समग्र भावविश्वाचे सूत्रसंचालन कथाकार करीत असतो. कथेतील निवेदक हा पात्र प्रसंगादीचे वर्णन वा कथन करीत असतो. प्रसंगी तो भाष्यही करीत एखाद्या पात्राच्या मनःस्थितीचा, कृतीचा, प्रसंगाचा आशय अधिक स्पष्ट करीत तो प्रसंगी मूल्यमापनही करीत असतो. म्हणूनच निवेदक हा सर्वज्ञ वा सर्वसाक्षी शकतो. निवेदक हा प्रथम पुरुषी किंवा तृतीयपुरुषी स्वरूपात असतो.

### *भाषा*

भाषा हा निवेदनाचाच घटक असला तरी कोणत्याही साहित्याची निर्मिती वा संहिता भाषेशिवाय साकार करता येणार नाही. म्हणून कथेची भाषा ही कल्पित विश्वाची किंवा कल्पित विश्व निर्माण करणारी भाषा असते. लेखकाला व्यक्त करावयाचे अनुभव, आशय व संवाद भाषेच्याच माध्यमातून व्यक्त करावे लागतात. म्हणून कथाकाराला भाषेच्या व्याकरणाबरोबरच भाषा संकेताचीही जाणीव असावी लागते. कथेतील पात्रानुरूप भाषेतला संवादही तर्कबद्ध असावा लागतो. शेवटी भाषेवरच समग्र कथेचा परिणाम अथवा प्रभाव अवलंबून असतो.

### *निष्कर्ष*

1.मराठी लोकसाहित्याला कथा वाङ्मयाचा मोठा वारसा लाभलेला आहे.
2.प्राचीन काळी मराठी कथा ही आख्यानक कविता, कथागीत, पोवाडा, लावणी यासारख्या माध्यमांतून प्रकट होत होती.
3.लोकांचे मनोरंजन करून त्यांना अध्यात्माचे व भक्तिमार्गाचे धडे देणे हे कथा वाङ्मयाचे प्रयोजन होते.
4.मुद्रणपूर्वकाळात कथा वाङ्मय हे लिखित स्वरूपात अस्तित्वात नव्हते, तर मौखिक परंपरेने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरीत होत होते.
5.गंगाधर गाडगीळ यांच्या कथा ही उपमा, उत्प्रेक्षा व प्रतिमांच्या कल्पकतेबरोबरच प्रयोगशील झाली आहे.
6.जी.ए. कुलकर्णी यांची कथा प्रथगात्म असून त्यांच्या कथेत वैश्विक सत्याचा शोध घेण्याचा तत्त्वचिंतक ध्यास आहे.
7.रचनेच्या दृष्टीने कथेचे उपप्रकार म्हणून दीर्घकथा, लघुकथा, कथामालिका, साखळी कथांचा निर्देश करावा लागतो, तर कथांच्या वर्गीरिणाच्या सोयीसाठी म्हणून ऐतिहासिक, पौराणिक, सामाजिक, ग्रामीण, दलित, गूढ, रहस्य, विज्ञान यांचा उल्लेख करावा लागतो.
8.मराठी नवकथा जीवनाच्या नव्या अनुभूतीतून निर्माण झाली असून तिने भावनाविवशतेचा संकेत झुगारून दिला.
9.कथात्मिक साहित्य हे अनुभवार्थ, कथानक व्यक्तिचित्रण, वातावरण, निवेदन आणि भाषा या घटकांच्या माध्यमातून साकारते.

### *संदर्भग्रंथ*

1.प्रा. घाटोळे रा.ना., मराठी वाङ्मयाचा इतिहास, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर
2.डॉ. टापरे पंडित, कथा : रूप आणि आस्वाद, नीहारा प्रकाशन, पुणे
3.डॉ. राजन गवस, डॉ.वरखेडे मंगला, कथा : स्वरूप आणि रचनातंत्र, यचममु विद्यापीठ, नाशिक
4.शेवडी इंदूमती, मराठी कथा उगम आणि विकास, सोमया पब्लिकेशन, मुंबई

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.net